DEPARTMENTAL EXAMINATION FOR SUBORDINATE SERVICES OF CO-OPERATIVE DEPARTMENT

Saturday, 15th April 2023

(Time : 2.30 p.m. to 5.30 p.m.)

(Maximum Marks - 100)

ACCOUNTS AND AUDITING – PAPER - II

(*Version* - English and Marathi) (Without Books)

N. B. : (1) Question No. 1 is compulsory. Solve any five questions out of remaining.
(2) Question No. 1 carries 25 marks and the remaining questions carry 15 marks each.
(3) English version will be considered as authentic.

---

1. From the following Trial Balance of Sarathi Co-operative Society, Mumbai as on 31st March 2022 and additional information, prepare Trading and Profit and Loss A/c for the year ending 31st March 2022 and Balance Sheet as on that date. **25**

TRIAL BALANCE

Particulars	Debit (Rs.)	Particulars	Credit (Rs.)
Opening Stock	12,000	Sales	3,44,000
Purchases	3,27,000	Sales of empty bags	14,000
Carriage Inward	4,000	Returns Outwards	5,000
Salaries	12,000	Reserve Fund	10,000
Int. on Govt. Loan	720	Govt. Loan	6,000
General Expenses	1,400	Education Fund	1,000
Printing & Stationary	170	Share Capital	50,000
Cash in Hand	4,840	Creditors	6,200
Cash at Bank	6,000		
National Saving Certificate	500		
Electricity	320		
Advances	850		
Debtors	5,600		
Dead Stock	800		
Building	60,000		
Total	4,36,200		4,36,200

Additional Information.

(1) Closing stock is valued at Rs. 18,000.

(2) Audit fee payable Rs. 500.

(3) Charge depreciation at 10% on dead stock and 5% on building.

(4) Make provision for Bad debts Rs. 200.

(5) Authorised Capital Rs. 1,00,000 divided into share of Rs. 20 each.

2. (A) Prepare a Bank Reconcillation Statement as on 31st December 2022 from the following details. **10**

(1) Bank Balance as per Cash Book Rs. 6,000.

(2) Cheques deposited but not collected till 31st December 2022 Rs. 2,000.

(3) Cheques issued but not presented till 31st December 2022 Rs. 1,500.

(4) Bank charges Rs. 30 but not entry in the Cash Book.

(5) Our customer has deposited Rs. 900 directly in our account, but no entry in the cash book.

(6) The Bank credited our account by collecting interest Rs. 150, but is not entered in cash book.

(B) State true or false : **05**

(1) All the errors and frauds are fully disclosed in internal checking.

(2) There is an audit for societies under liquidation.

(3) Standard Auditing Policies are established by ICAI.

(4) Closing stock is valued at cost or market price whichever is less.

(5) Receipt and payment account shows the amount of profit earned or loss suffered.

3. Write full forms of **15**

(1) PACS

(2) DCCB

(3) NABARD

(4) FIR

(5) CRAR

(6) SIDBI

(7) UTI

(8) ROCE

(9) TDS

(10) EDP

(11) AASB

(12) NPA

(13) MCS ACT

(14) CHSL

(15) NDTL

4. Fill in the blanks. **15**

(1) ..... is a list of balances of ledger accounts and cash book.

(2) Final accounts should be prepared in ..... days from the date of year ending.

(3) Cash book does not shows ..... balance.

(4) The ..... has powers to inspect day to day working of a co-operative society.

(5) The Balance sheet is not an ..... but it is a statement.

(6) The name of co-operative society is ..... asset of the society.

(7) The main objective of ..... is to find out the all errors and frauds.

(8) Flying squad is appointed by ..... .

(9) Continuous and concurrent audit is a type of ..... audit.

(10) Internal check and internal audit are part of ..... system.

(11) The dead stock is shown on the ..... side of balance sheet of sugar factory.

(12) Fixed asset are valued at ..... cost.

(13) ..... reserve is illegal.

(14) Depreciation is charged on a ..... asset.

(15) ..... is a documentary evidence in support of a transaction in the books of accounts.

5. Journalise the following transactions in journal. **15**

(1) 2nd February 2022 sold goods on credit to Sunanda Rs. 40,000.

(2) 3rd February 2022 paid salary in cash to Mr. Madhav Rs. 75,000.

(3) 5th February 2022 paid office rent by cheque to Rama Rs. 20,000.

(4) 6th February 2022 Cash deposited in Bank Rs. 1,30,000

(5) 7th February 2022 goods withdrawn for personal use Rs. 15,000.

(6) 9th February 2022 purchased goods for cash Rs. 80,000 from Raghunath.

(7) 10th February 2022 spent Rs. 2,000 for postage.

(8) 11th February 2022 paid Rs. 2,500 for travelling.

(9) 15th February 2022 purchased Machinary from M/s. Jaykar & Co. Rs. 10,00,000.

(10) 20th February 2022 brought stationary Rs. 20,000.

(11) 21st February 2022 amount Rs. 2,50,000 deposited into Bank.

(12) 23rd February 2022 paid Gulabchand Rs. 2,00,000 at 2% cash discount.

(13) 25th February 2022 Return goods to Joshi & Co. Rs. 1,00,000.

(14) 27th February 2022 Received interest Rs. 12,000.

(15) 28th February 2022 Introduced additional capital Rs. 20,00,000.

6. Explain Difference Between. **15**

(1) Audit Report and Special Report.

(2) Reserve and Provisions.

(3) Reaudit and Test audit.

(4) Cheque and Demand Draft.

(5) Receipts and Payment Account and Income and Expenditure Account.

7. Explain the provisions regarding audit fees and audit classification of co-operative societies. **15**

मराठी रूपांतर

सूचना : (१) प्रश्न क्रमांक १ अनिवार्य आहे. उर्वरित प्रश्नांपैकी कोणतेही पाच प्रश्न सोडवा.

(२) प्रश्न क्रमांक १ साठी २५ गुण आहेत. उर्वरित प्रत्येक प्रश्नांना प्रत्येकी १५ गुण आहेत.

(३) भाषांतरासाठी इंग्रजी माध्यमातील प्रश्नपत्रिका अधिकृत मानण्यात येईल.

---

१. सारथी सहकारी संस्था, मुंबईच्या दिनांक ३१ मार्च, २०२२ च्या खाली दिलेल्या तेरीजपत्रकावरून तिचे दिनांक ३१ मार्च २०२२ रोजी संपणाऱ्या वर्षाचे व्यापारी पत्रक नफा-तोटा पत्रक व त्या तारखेचा ताळेबंद तयार करा. **२५**

तपशील	नावे रुपये	तपशील	जमा रुपये
सुरुवातीचा माल साठा खरेदी	१२,०००	विक्री	३,४४,०००
खरेदी	३,२७,०००		
खरेदीवरील खर्च	४,०००	रिकाम्या गोण्यांची विक्री	१४,०००
वेतन	१२,०००	खरेदी माल परत	५,०००
सरकारी कर्जावरील व्याज	७२०	राखीव निधी	१०,०००
किरकोळ खर्च	१,४००	सरकारी कर्ज	६,०००
छपाई व स्टेशनरी	१७०	शिक्षण निधी	१,०००
रोख शिल्लक	४,८४०	भाग भांडवल	५०,०००
बँकेतील शिल्लक	६,०००	व्यापारी देणी	६,२००
राष्ट्रीय बचत प्रमाणपत्रे	५००		
वीज खर्च	३२०		
आगाऊ रकमा	८५०		
व्यापारी येणे	५,६००		
मृत साठा	८००		
इमारत	६०,०००		
एकूण	**४,३६,२००**		**४,३६,२००**

तरतुदी (Adjustments) :

(१) शेवटचा माल साठा रुपये १८,०००.

(२) देय अंकेक्षण शुल्क रुपये ५००.

(३) इमारतीवर ५ टक्के व मृत साठ्यावर १० टक्के झीज आकारावयाची आहे.

(४) बुडीत कर्जासाठी रुपये २०० ची तरतूद करा.

(५) संस्थेचे अधिकृत भांडवल रुपये १,००,००० चे असून ते प्रत्येकी रुपये २० चा एक भाग असे विभागलेले आहे.

२. **(अ)** खालील व्यवहारांवरून ३१ डिसेंबर २०२२ अखेरचे बँक मेळपत्रक तयार करा. १०

(१) कॅशबुकप्रमाणे रोख शिल्लक रुपये ६,०००.

(२) रुपये २,००० चे धनादेश बँकेत भरले पण ३१ डिसेंबर, २०२२ अखेर जमा झाले नाहीत.

(३) रुपये १,५०० चे धनादेश दिले पण ३१ डिसेंबर २०२२ अखेर बँकेत सादर झाले नाहीत.

(४) रुपये ३० बँकेने चार्जेस आकारले, पण त्याची नोंद कॅशबुकमध्ये नाही.

(५) एका ग्राहकाने परस्पर रुपये ९०० आपल्या खात्यात भरले, पण त्याची नोंद कॅशबुकला नाही.

(६) बँकेने आपल्या खात्यात रुपये १५० व्याज जमा केले, पण कॅशबुकला त्याची नोंद नाही.

(ब) चूक की बरोबर लिहा ०५

(१) अंतर्गत तपासणीमुळे चुका व अफरातफरी पूर्णपणे निदर्शनास येते.

(२) अवसायनातील संस्थांकरिता लेखापरीक्षण असते.

(३) प्रमाणित लेखापरीक्षण धोरणे आय.सी.ए.आय. द्वारे निर्धारित करण्यात आली आहेत.

(४) अखेर शिल्लक माल मूळ किंमत किंवा बाजार किंमत यापैकी कमी असलेल्या किमतीस नोंद करतात.

(५) जमाखर्च खाते नफा किंवा तोटा दर्शवितो.

३. खालील संक्षिप्त शब्दांचे पूर्ण रूप लिहा. १५

(१) पी.ए.सी.एस.

(२) डी.सी.सी.बी.

(३) नाबार्ड

(४) एफ.आय.आर.

(५) सी.आर.ए.आर.

(६) एस.आय.डी.बी.आय.

(७) यु.टी.आय.

(८) आर.ओ.सी.ई.

(९) टी.डी.एस.

(१०) ई.डी.पी.

(११) ए.ए.एस.बी.

(१२) एन.पी.ए.

(१३) एम.सी.एस. ॲक्ट

(१४) सी.एच.एस.एल.

(१५) एन.डी.टी.एल.

४. रिकाम्या जागा भरा. १५

(१) सर्व किर्दीच्या व रोजकिर्दीच्या शिल्लक रकमांची यादी म्हणजे ..... .

(२) अंतिम हिशोब पत्रके वर्षअखेरीच्या तारखेपासून ..... दिवसांच्या आत तयार करणे आवश्यक असते.

(३) रोख पुस्तक ..... बाकी दाखवीत नाही.

(४) सहकारी संस्थेच्या दैनिक कामकाजाची चौकशी करण्याचा ..... अधिकार आहे.

(५) ताळेबंद हे ..... नसून एक पत्रक असते.

(६) सहकारी संस्थेचे नाव हे त्या संस्थेची ..... मालमत्ता असते.

(७) ..... चा मुख्य उद्देश हा सर्व अफरातफर व चुका शोधणे असा आहे.

(८) फिरते पथक हे ..... यांचेकडून नेमले जाते.

(९) सतत व समवर्ती लेखापरीक्षण हा ..... लेखापरीक्षणाचा एक प्रकार आहे.

(१०) अंतर्गत तपासणी आणि अंतर्गत अंकेक्षण हे ..... प्रणालीचा एक भाग आहे.

(११) डेड स्टॉक साखर कारखान्याच्या ताळेबंदाच्या ..... बाजूला दाखविला जातो.

(१२) स्थावर मालमत्तेचे ..... या दराने मूल्यांकन केले जाते.

(१३) ..... निधी हा बेकायदेशीर असतो.

(१४) घसारा हा ..... मालमत्तेवर आकारला जातो.

(१५) ..... म्हणजे लेखापुस्तकात लिहीलेल्या नोंदींच्या संदर्भातील पुरावा होय.

५. खालील व्यवहार कीर्द वहीत (Journal) नोंदवा. १५

(१) दिनांक २ फेब्रुवारी २०२२ सुनंदा यांना उधारीने माल विक्री रुपये ४०,०००.

(२) दिनांक ३ फेब्रुवारी २०२२ श्री. माधव यांना रोखीने पगार दिला रुपये ७५,०००.

(३) दिनांक ५ फेब्रुवारी २०२२ रमा यांना चेकने ऑफिस भाडे दिले रुपये २०,०००.

(४) दिनांक ६ फेब्रुवारी २०२२ बँकेत रोख रक्कम भरली रुपये १,३०,०००.

(५) दिनांक ७ फेब्रुवारी २०२२ खासगी वापरास व्यवसायातून माल घेतला रुपये १५,०००.

(६) दिनांक ९ फेब्रुवारी २०२२ रघुनाथ यांचेकडून रोखीने माल खरेदी केला रुपये ८०,०००.

(७) दिनांक १० फेब्रुवारी २०२२ पोस्टेज रुपये २,००० खर्च केले.

(८) दिनांक ११ फेब्रुवारी २०२२ प्रवास खर्च रुपये २,५०० खर्च केले.

(९) दिनांक १५ फेब्रुवारी २०२२ मे. जयकर आणि कंपनी यांचेकडून मशिनरी खरेदी केली रुपये १०,००,०००.

(१०) दिनांक २० फेब्रुवारी २०२२ स्टेशनरी साहित्य खरेदी केले रुपये २०,०००.

(११) दिनांक २१ फेब्रुवारी २०२२ बँकेत रुपये २,५०,००० रोख भरणा केला.

(१२) दिनांक २३ फेब्रुवारी २०२२ गुलाबचंद यांना २ टक्के रोख सूटने रुपये २,००,००० दिले.

(१३) दिनांक २५ फेब्रुवारी २०२२ जोशी आणि कंपनीला रुपये १,००,००० किमतीचा माल परत केला.

(१४) दिनांक २७ फेब्रुवारी २०२२ व्याज मिळाले रुपये १२,०००.

(१५) दिनांक २८ फेब्रुवारी २०२२ जादा / अतिरिक्त भांडवल रुपये २०,००,०००.

६. फरक स्पष्ट करा. १५

(१) लेखापरीक्षण अहवाल आणि विशेष अहवाल.

(२) निधी आणि तरतुदी.

(३) फेर लेखापरीक्षण आणि चाचणी लेखापरीक्षण.

(४) धनादेश आणि धनाकर्ष.

(५) प्राप्ती व चुकारा खाते आणि उत्पन्न व खर्च खाते.

७. सहकारी संस्थांची ऑडीट फी व लेखापरीक्षण वर्गवारीबाबतच्या तरतुदी स्पष्ट करा. १५